## *एकात्मिक बाल विकास सेवा योजना*

बाल्यावस्था हा मुलांच्या वाढीचा व विकासाच्या टप्प्यातील अत्यंत महत्वाचा कालावधी आहे.शासनाने जन्मापुर्वी व जन्मानंतर बालकांना पुरेशा सेवा देण्याचे राष्ट्रीय धोरण स्विकारले आहे.यानुसार २ आक्टोबर १९७५ पासुन प्रायोगिक तत्वावर एकात्मिक बाल विकास सेवा योजना मुलांचे सर्वागिन विकासासाठी तसेच आरोग्य, आहार व शिक्षण एकत्रितपणे देण्याच्या उद्येशाने सुरु करण्यात आली.गरीब कुटुंबातील महिला आणि मुले यांच्यासाठीच्या आणि राज्यभरात ८८,२७२ अंगणवाडी केंद्रे, ग्रामीण भागात ३६४ प्रकल्प, ८५ आदीवासी प्रकल्प व १०४ शहरी प्रकल्प असणारा हा सर्वात मोठा कार्यक्रम आहे.

### *योजनेचा उद्येश*

१) ०ते६ वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य दर्जा सुधारणे
२) मुलांच्या योग्य मानसिक,शारीरिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे.
३) बालमृत्युचे,बालरोगाचे,कुपोषणाचे व शाळा गळतीचे प्रमाण कमी करणे.
४) बाल विकासाला चालना मिळावी म्हणुन विविध विभागामध्ये धोरण व अंमलबजावणीबाबत परिणामकारक समन्वय साधणे.
५) योग्य पोषण व आरोग्यविषयक शिक्षणाव्दारे बालकांचे सर्वसामान्य आरोग्य व पोषणविषयक गरजांकडे लक्ष पुरविण्याबाबत मातांची क्षमता वाढविणे.

### *लाभार्थी गट-*

| ०ते ६ वयोगटातील मुले- | गरोदर माता व स्तनदा माता- | १५ते ४५ वयोगटातील स्त्रिया |
|---|---|---|
| **सेवाः-** | | |
| १) लसीकरण | १) लसीकरण | १)आहार व आरोग्य शिक्षण |
| २)आरोग्य तपासणी | २) )आरोग्य तपासणी | |
| ३)पुरक पोषण आहार | ३) )पुरक पोषण आहार | |
| ४)संदर्भ सेवा | ४)आहार व आरोग्य शिक्षण | |
| ५)अनौपचारीक शालेय पुर्व शिक्षण | ५)संदर्भ सेवा | |

### *१)पुरक पोषण आहार-*

अंगणवाडी केंद्रस्तरावर पुरक पोषण आहार पुरविणेत येत असल्याने ग्रामीण क्षेत्रातील बालकांमधील कुपोषणचे प्रमाण कमी करणे,शारीरिक व बौध्दिक विकास करणे,आजाराचे प्रमाण कमी करणे,रोग प्रतिकार शक्ती वाढविणे,माता व महिलांना आहार व आरोग्यविषयक शिक्षण देणे इ.उद्यिष्टे साध्य होतात.

३ते६वयोगटातील बालकांना दोन वेळेस ५००कि.ग्रॅ.उष्मांक आणि १२ते१५ग्रॅम प्रथिनयुक्त आहार स्थानिक महिला बचतगटामार्फत पुरविण्यात येतो.यामध्ये सकाळचा नाष्टा व दुपारी पुरक पोषण आहार इ.चा समावेश आहे.

### घरी घेवुन जाण्यासाठी आहार पुरवठा(THR-Take Home Ration)

सुधारित प्रमाणकानुसार ६महिने ते ३ वर्ष वयोगटामील लाभार्थी,६महिने ते ६वर्षतीव्र कमी वजनाची बालके,गरोदर व स्तनता माता व किशारी मुली यांनी घरी घेवुन जाण्यासाठी THR आहार पुरवठा करण्यात येत आहे.सर्व पाककृतीसाठी लाभार्थी प्रकारानुसार २५ दिवसाची(एक महिना)पॅकींग साईज,प्रति दिन लाभार्थी सर्व्हिंग साईज,प्रति दिन प्रति लाभार्थी देय आर्थिक निकष केंद्र व राज्य शासनाने निश्चित केले आहेत.

## २)लसीकरण

बालकांचे आरोग्य पोषण यांचा घनिष्ठ संबध आहे.बालकांमध्ये रोगप्रतिकार शक्ती निर्माण करुनत्यांचे आरोग्य चांगले ठेवण्याचे दृष्टिने एकात्मिक बाल विकास सेवा योजना व आरोग्य विभाग यांचे समन्वयाने ६ वर्षाखालील सर्व बालकांना वयानुसार सहा बालरोगापासुन संरक्षण करण्यासाठी डांग्या खोकला,घटसर्प,क्षयरोग,पोलीओ,गोवर इ.लसी देण्यात येतात.तसेच गरोदर स्त्रियांना धनुर्वातापासुन संरक्षण करण्यासाठी धनुर्वात प्रतिबंधक लस देण्यात येते.

**अंगणवाडी कार्यक्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया,स्तनदा माता व किशोरी तसेच ०ते ६ वर्ष वयोगटातील बालकांची आरोग्यतपासणी वर्षातुन किमाण ४वेळा आरोग्य विभागाकडुन केली जाते.**

## ४)संदर्भ आरोग्य सेवा-

ग्रामीण भागातील लाभार्थ्याची आरोग्यतपासणी झाल्यानंतर गंभीर स्वरुपाचे आजार असल्यास अशा महिला व बालकांना सविस्तर सेवेकरिता ग्रामीण रुग्नालय व जिल्हा रुग्नालयात पाठविले जाते.तथापि अंगणवाडी केंद्रामार्फत संदर्भ सेवा देण्यात येते.रुग्ण, बालके/मलिांना संदर्भ सेवेव्दारे प्राथमिक आरोग्य केंद्र/ग्रामीण रुगनालयामध्ये भरती करण्यात येते.ज्यांचे पालक औषधे खरेदी करण्याकरीता पैसे नसल्यामुळे उपचार घेण्याचे टाळतात,अशा करिता प्राथमिक आरोग्य केंद्रातुन औषधी पुरविण्यास निधी उभारणे तसेच ग्रामस्थाकडुन मदत घेवुन औषधे उपलब्ध करुन देण्यासाठी अंगणवाडीमार्फत प्रयत्न करणेत येतात.

## ५) आरोग्य व सकस आहार विषयक शिक्षण-

१५ते४५ वयोगटातील स्त्रिया,स्तनदा माता व किशोरवयीन मुलींना बालकांचा विकास साधन्याचे दृष्टिने पोषण आहार व आरोग्य शिक्षण दिले जाते.यासाठी अंगणवाडीस्तरावर नियमितपणे गृहभेटी देवुन तसेच महिला मंडळाच्या सभा/स्वयंसहायता गटाच्या सभा,गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांच्या तपासणीचे वेळी उपकेंद्रामध्ये,बालकांची वजने घेण्याचे दिवशी,लसीकरणाच्या दिवशी,उत्सव,जत्रा,आठवडी बाजार यावेळी माता बाल संगोपन,सकस आहार प्रात्यक्षिके,वैयक्तिक स्वच्छता,परिसर स्वच्छता इ.विषयावर माहीती दिली जाते.

## ६)अनौपचारीक शालेय पुर्व शिक्षण-

३ते ६ वर्षातील बालकांचा बौध्दिक,सामाजिक,भावनिक व शारिरीक कौशल्येही विकसित होणे आवश्यक आहे.मुलांना शाहेची ओळख व गोडी निर्माण करण्याचे दृष्टिने लहान मुलांना शाळापुर्व शिक्षण औपचारिक पध्दतीने न देता अनौपचारीक पध्दतीने दिले जाते.निसर्गातील पाने,झाडे,फुले व फळे व स्थानिक पातळिवर उपलब्ध असलेल्या साहित्यामधुन आनंददायी शिक्षण दिले जाते.

## राजीव गांधी किशोरी सबलिकरण योजना

महाराष्ट्रातील ११ जिल्हयातील एकात्मिक बाल विकास प्रकल्पाअंतर्गत ११ते १८ वयोगटातील किशोरींना या योजनेचा लाभ देण्यात येईल.योजना सर्वगामी करण्यासाठी लाभार्थ्याचे दोन गट करण्यात येतील.उदा.११ते१५ व १५ते१८ वयोगटानुसार विभागणी करुन नियोजन करण्यात येईल.सर्व शाळाबाहय किशोरीवरही योजनेव्दारे लक्ष केंद्रीत करावयाच ेअसुनस्थानिक प्रशासनाने निश्चित केलेल्या वेळेत सर्व किशारींनी अंगणवाडी केंद्रात येणे अपेक्षित आहे.इतर म्हणजे शाळेत जाणा-या मुली महिन्यातुन किमाण दोनदा व सुटटीच्या काळातवारंवार अंगणवाडीत एकत्र येतील.या ठिकाणी त्यांना जिवणप्रणलीचे शिक्षण,सामाजिक/कायदेविषयक समस्याबद्यलची जागृती इत्यादीबाबत माहीती मिळेल.यामुळे शाळेत जाणा-या व शाळेत न जाणा-या मुलींना एकत्र येण्याची संधी मिळुन विचारांची देवाणघेवाण होईल.त्यामुळे शाळाबाहय मुलींना शाळेत जाण्याची स्फुर्ती मिळेल.

वृध्दिसनियंत्रण-

जन्मल्यापासुन बालकाच्या शारिरीक, मानसिक व बौध्दिक विकास झपाटयाने व एका विशिष्टक्रमाण होत असतो.जागतिक आरोग्य संघटनेने तयार केलेल्या बालकांच्या वाझ्रीचे नवीन मापदंड सन २००६ नुसार बालकांच्या वृध्दीचे सनियत्रण वृध्दिआलेखाच्या सहाय्याने **वयानुसार वजन** या निर्देशंकाव्दारे केले जाते.योजनेव्दारे अंगणवाडी स्तरावर दरमहा १०ते १५ तारखेदरम्यान मुलांचे व मुलींचे वृध्दिपत्रक वेगवेगळे करुन बालकांचे वजन घेवुन त्याची नोंद वृध्दिपत्रकात घेतली जाते.बालकांच्या वाढीच्या टप्प्यात अडथळा येत असेल तर सहज लक्षात येवुन वेळेवर योग्य ती प्रतिबंधात्मक काळजी घेता येते.अति तीव्र कमी वजनाची बालके अति धोकादायक असल्यामुळे ताबडतोब वैदयकिय उपचार व संदर्भ सेवा देण्यात येते.बालकांचे वजन घटण्यास व वाढ न होण्यास कारणभुत असणा-या अनेक कारणांची ,आजारांची माहीती शोधुन (डायरिया,श्वसन,जंतुसंसर्ग,अपुरा आहार,आईचे आजारपण)त्यानुसार वेळेवर सुधारात्मक उपचार करणे सहज शक्य होते.आरोग्याची काळजी तसेच त्यांच्या वृध्दि व विकासासंबधी मातांचे व कुटुंबातील सदस्यांचे समुपदेशन करणे या गोष्टी प्रभाविपणे करणेस मदत होते.

**संपर्क-**

| | |
|---|---|
| ग्रामपंचायत | -अंगणवाडी सेविका |
| पंचायतसमिती | -पर्यवेक्षिका/बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| जिल्हा परिषद | - उपमुख्यकार्यकारी अधिकारी(महिला व बाल कल्याण) |

## महिला व बाल कल्याण विभाग ,जिल्हा परिषद बुलडाणा

महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महिला व बाल कल्याण विभाच्या माध्यमातुन अनंक योजना राबविल्या जातात.प्राधान्याने महिलांनी छोटा उदयोग व्यवसाय करावा.आणि त्याचा आर्थिक विकास साधावा म्हणुन विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते.

### १.जागतिक महिला दिन/महिला मेळावे

दि.८मार्च रोजी जिल्हयामध्ये तालुकास्तर जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो.या कायेक्रमासाठी महिला प्रतिनिधी,महिला मंडळावरील महिला प्रतिनिधी,महिला सदस्या यांना या कार्याक्रमासाठी प्राचारण करण्यात येवुन महिला मेळाव्यामध्ये महिलांसांठी मागदर्शन करण्यात येते.

### २.अंगणवाडी/बालवाडींना साहित्य पुरविणे

अंगणवाडी/बालवाडीतील बालकांच्या सर्वागिन विकासासाठी या योजना १००%अनुदानावर राबविण्यात आल्या आहेत.

### ३.महिला प्रतिनिधींसाठी अभ्यास दौरा

महिला व बाल कल्याण विषय समितीचे सदस्य दुस-या जिल्हयात जावुन त्या जिल्हयातील महिलांसाठी राबविल्या जाणा-या योजनांचा अभ्यास करणे.

### ४.महिला समुपदेश केंद्र

महिला समुपदेशन केंद्रामार्फत ग्रामीण भागातील महिलांसाठी योजना राबविण्यात येत आहे.यामध्ये कुटुंबातील मारहान,लेंगिक छळ व ईतर त-हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक,मानसशास्त्रीय,कायदेशिर समुपदेशनासाठी सदर योजना राबविण्यात येते.

### ५.१२वी पास मुलींना MS-CITप्रशिक्षण देणे.

आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील १२वी पास मुलींना MS-CIT प्रशिक्षण देण्यात येते.

### ६.आदर्श अंगणवाडीतील सेविकांना पुरस्कार योजना

अंगणवाडी सेविकांना चांगल्या काम केल्याबददल तसेच अंगणवाउी केंद्र उत्कृष्टरित्या असल्याबाबत त्यांना आदर्श अंगणवाडी पुरस्कार महिला व बाल कल्याण विभागामार्फत देण्यात येतो.

### ७.महिलांना साहित्य पुरविणे

महिलांनी छोटा व्यवसाय करावा यासाठी महिलांना साहित्य पुरविण्यात येते.